# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### केंद्र शासनाची जल जीवन मिशन योजना राज्यात राबविण्याबाबत

**(१) ३१४५६ (१८-०६-२०२१). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास नळावाटे शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाने जल जीवन मिशन ही योजना सुरु केली असून सन २०२० - २१ साठी केंद्राने दिलेल्या १८२८.९२ कोटी रुपयांपैकी राज्य शासनाने केवळ ४५७ कोटी रुपये खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना राज्यात संथ गतीने सुरु असून या अतंर्गत राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये ४०५९९ गावांमध्ये प्रत्येक घरास नळाव्दारे पाणीपुरवठा करण्याचे उद्दीष्ट असून जल जीवन मिशनकरीता पाच वर्षासाठी रु. १३६६८.५० कोटी आराखड्यास मा. मंत्रीमंडळाने तत्वत: मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यस्थितीत जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कार्यरत असले तरी अपूरे मनुष्यबळ आणि कार्यक्रमाच्या व्याप्तीमुळे जीवन मिशन योजनेचे काम करणे शक्य नसल्याने सदर संस्था पुरक संस्था म्हणूनच काम करणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामीण भागातील गरीब लाभार्थ्याला नळावाटे शुद्ध पाणीपुरवठा करण्याची ही योजना लवकरात लवकर पुर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०९-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. केंद्रशासनाने रु.१८२८.९२ कोटी नियतव्यय कळवला होता. राज्यशासनाने जल जीवन मिशन अंतर्गत सन २०२०-२०२१ वित्तीय वर्षाकरीता राज्यहिश्यापोटी रु.६८० कोटी तर केंद्र हिश्श्यापोटी रु.१५४६ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केलेला होता. सदर निधी व राज्य हिश्श्याचा निधीतून वित्तीय वर्ष २०२०-२०२१ मध्ये रु.७५१.९३ कोटी निधी खर्च झाला आहे.

(२) (३) व (४) राज्य मंत्रीमंडळाच्या दि.०८.०७.२०२० रोजीच्या बैठकीत जल जीवन मिशनच्या पाच वर्षासाठी रु.१३६६८.५० कोटी आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार या विभागाचे दि.०४.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

यानुसार राज्य पाणी व स्वच्छता मिशनची पुनर्रचना करण्यात आली असून सदर संस्थेस जल जीवन मिशनची कार्यन्वयन यंत्रणा म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे. या मिशनमध्ये राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती स्थापन करण्यात आली. मिशन अंतर्गत भारतीय प्रशासकीय सेवा संवर्गातील “जल जीवन मिशन संचालक” हे पद नव्याने निर्माण करण्यात आले असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक पदे निर्माण करण्यात आली आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हास्तरावर लोक प्रतिनिधींचा समावेश असलेली मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समिती व प्रशासकीय अधिकारी यांचा समावेश असलेली जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांनी तयार केलेल्या जिल्हास्तरीय आराखड्यांना राज्यस्तरीय समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे अंमलबजावणी

यंत्रणा म्हणून काम करणार आहेत. सन २०२१-२०२२ मध्ये जिल्हानिहाय उद्दिष्ट विहीत मुदतीत साध्य करण्याच्या सूचना अंमलबजावणी यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील युवकांना, विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत**

**(२) ३५७१० (१२-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीन तंत्रज्ञानातील संधी ओळखून दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील युवकांना, विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने विशेष कृती आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत आर्थिक दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगारांचे तसेच अशिक्षित बेरोजगारांचे शासनाने सर्वेक्षण केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वित्तीय क्षेत्र, बँकिंग यासारख्या क्षेत्रांमध्ये युवकांना रोजगार मिळावा याकरीता प्रशिक्षण कौशल्य कार्यक्रम राबविण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२५-०७-२०२३) :** (१) दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील युवकांना, विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी विभागामार्फत "विशेष कृती आराखडा" तयार केला नसून, कौशल्य अभाव अभ्यास अहवाला च्या (Skill Gap Report) आधारे राज्यातील कुशल मनुष्यबळाच्या मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी सर्व जिल्हयांकरिता जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीमार्फत, जिल्हयांकरिता "कौशल्य अभाव अभ्यास" (Skill Gap Report) तयार करण्यात येतो.
(२) आर्थिक दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगारांचे तसेच अशिक्षित बेरोजगारांचे या विभागातर्फे सर्वेक्षण करण्यात आले नाही. राज्यातील सर्व प्रवर्गातील १५ ते ४५ वयोगटातील युवक युवतींकरिता तसेच जिल्हयातील औद्योगिक आस्थापनांकरिता आवश्यक कुशल मनुष्यबळाचा मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कौशल्य अभाव अंतर (Skill Gap Report) दूर करण्यासाठी राज्यातील ३६ जिल्हयांचा "कौशल्य अभाव अभ्यास" (Skill Gap Report) जिल्हास्तरीय अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर अहवाल http://kaushalya.mahaswyam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.
(३) राज्यातील युवक-युवतींना वित्तीय सेवा, बँकीग, इन्शुरन्स या विषयातील प्रशिक्षण देवून रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतात. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत सन २०१५-१६ ते सन २०२१-२२ पर्यंत बँकीग, फायनान्स सर्व्हिसेस आणि इन्शुरन्स क्षेत्रातील कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये एकुण २५०९६ उमेदवारांचे मुल्यांकन करण्यात आले आहे तर १००६५ उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.
(४) (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथरी (ता.केळापूर जि.यवतमाळ) येथील प्राथमिक उपकेंद्रामध्ये सुविधाचा अभाव असल्याबाबत**

**(३) ४०३४९ (२४-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी (ता.केळापूर जि.यवतमाळ) येथील प्राथमिक उपकेंद्रातील डॉक्टर व इतर कर्मचारी यांची पदे रिक्त असून पूर्ण वेळ उपकेंद्र चालू राहत नसल्याने गरीब व गरजू रूग्णांना आरोग्याच्या सुविधा मिळत नसल्याचे दिनांक २२ जानेवारी २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक उपकेंद्राचे दरवाजे व खिडक्या नादुरूस्त असून संबधीत विभागाच्या अधिकाऱ्याचे दुर्लक्ष झाले असल्याने अनेक वेळा उपकेंद्रातील साहित्य चोरीला गेल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदर प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची व्यवस्था सुधारणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही. पाथरी उपकेंद्रातील आरोग्य सेवक (पुरूष) व आरोग्य सेविका (महिला) हे दिनांक २२.१.२०२२ रोजी व त्यासुमारास हरघर दस्तक या कोविड-१९ लसीकरण मोहिमेच्या कार्यक्रमांतर्गत लसीकरण करण्याकरीता घरोघरी जाऊन कार्य करीत होते.
(२) हे खरे नाही. पाथरी उपकेंद्र दरवाजे खिडक्या सुस्थितीत आहेत. उपकेंद्र निर्मितीपासून उपकेंद्रातील साहित्य चोरीला गेल्याची कोणतीही घटना घडलेली नाही तसेच अधिनस्त कर्मचारी यांचेकडून याबाबत तक्रार सुद्धा प्राप्त झालेली नाही.
(३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट तसेच समुद्रपूर या दोन्ही पंचायत समितीच्या नवीन इमारतीच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत**

**(४) ४१३१८ (०१-०४-२०२२). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट पंचायत समिती तसेच समुद्रपूर पंचायत समिती या दोन्ही पंचायत समितीच्या इमारती फार जुन्या असून जीर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जीर्ण झालेल्या दोन्ही इमारतीमध्ये कर्मचाऱ्यांना काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन इमारतीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी देण्यासाठी कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) ग्राम विकास विभागाच्या दिनांक ३० मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, पंचायत समिती, हिंगणघाट (जि. वर्धा) येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या रु.१४९९.३४ लक्ष व पंचायत समिती, समुद्रपूर (जि.वर्धा) येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या रु.११८६.६१ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

---

**परभणी जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी कार्यारंभ आदेश दिल्याबाबत**

**(५) ४५५६० (०९-१०-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कोणत्याही सुचना न देता जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी ३ कोटी ५८ लाख ८६ हजार ६८९ रुपयांच्या फर्निचर कामाचे कार्यारंभ आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मनमानी पध्दतीने कार्यारंभ आदेश काढणाऱ्या कार्यकारी अभियंत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सुरु असलेल्या कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही,
जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेच्या मान्यतेने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नुसार फर्निचर या कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आला असून काम प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ऑटोरिक्षा चालकांच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत**

**(६) ४५७२६ (१७-०९-२०२२). श्री. सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऑटोरिक्षा चालकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी दिनांक ९ मार्च २०१८ रोजी राज्याच्या अर्थसंकल्पात ऑटोरिक्षा चालक कल्याणकारी महामंडळाची स्थापना करण्यात येऊन त्यासाठी ५ कोटी रू. ची तरतूद जाहीर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तीन वर्षाचा कालावधी लोटूनही अद्याप ऑटोरिक्षा चालकांसाठी कल्याणकारी महामंडळाची स्थापना न होण्यामागील नेमकी कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा. परिवहन मंत्री यांच्याशी सातत्याने पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्सास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२६-०७-२०२३) :** (१) होय खरे आहे.
(२), (३) व (४) असंघटित क्षेत्रातील कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी मंडळे स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच विविध संघटनांमार्फत सातत्याने मागणी होत असल्याने राज्यातील विविध उद्योग क्षेत्रातील असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी दि. ०६/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये “असंघटित कामगार कल्याण महामंडळ” व व्यवसाय/उद्योगक्षेत्र निहाय ३९ आभासी मंडळे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
विविध उद्योग क्षेत्रातील असंघटित क्षेत्रातील व्यवसायानुसार दि. ०६/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट १ नुसार असंघटित कामगारांचे वर्गीकरण करण्यात आले असुन, परिशिष्ट १ मधील अनुक्रमांक ६ मध्ये ऑटो-रिक्षा व टॅक्सी तसेच प्रवासी तथा व्यावसायीक वाहन चालक, क्लीनर या कामगारांचा समावेश करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धामणगाव रेल्वे तालुक्यातील (जि.अमरावती) ५ गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या इमारती नसल्याबाबत**

**(७) ४६५४९ (०७-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यामधील ५ गावांमध्ये ग्रामपंचायत इमारती नसल्याने पदाधिकारी व ग्रामसेवकांना शासकीय कामकाज करण्यास मोठी अडचण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ५ गावांकरीता ग्रामपंचायत इमारत (भवन) निर्माण करण्याकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामनगाव रेल्वे) यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २९.१२.२०२१ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त मागणीनुसार या गावांच्या ग्रामपंचायत इमारतीकरीता निधीस मंजूरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१), (२) व (३) होय,

स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यातील २२ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामांना मंजुरी देण्यात आलेली असून उर्वरीत ग्रामपंचायतींना इमारत बांधकामाच्या संदर्भात निधी, निकष, प्राथम्य क्रम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन अनुदानासाठी लावलेली उत्पन्नाची अट रद्द करणेबाबत

**(८) ५३०२३ (२१-०१-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ६०,००० ग्रामपंचायत कर्मचारी हा शासनाचा शेवटचा घटक असून, तो प्रामुख्याने ग्रामपंचायत मध्ये लोकांच्या मूलभूत गरजांचे कामे व शासनाची कामे खऱ्या अर्थाने सदर कर्मचारी काम पाहत असतो. उदा. गावाला पाणी पाजणे, गावातील दिवाबत्ती करणे, गावातील साफसफाईचे काम करणे व सर्व शासकीय स्तरावरून येणाऱ्या विविध योजनांचा पूर्णत्वाचे स्वरूप प्राप्त व्हावे यासाठी ग्रामपंचायत स्तरावरून मुख्य कामे करतानाही महाराष्ट्र राज्यात सदर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन अनुदानासाठी लावलेली ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची अट पुर्णतः रद्द करुन १०० टक्के वेतनासाठी अनुदान देण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन, यवतमाळ यांनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे यांची गणना होत नसून, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी शासनाने लावलेली मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ ची कलम ६१ प्रमाणे २५%, ५०% व ७५% किमान वेतन कर्मचाऱ्यांच्या हातात पडते, त्यावर सदर कर्मचाऱ्यांचा कुटुंबाचा व इतर होणारा खर्च हा भागत नाही. त्यामुळे या कर्मचारी वर्गावर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपरिषदा व जिल्हा परिषद कर्मचाऱ्याप्रमाणे १००% वेतन श्रेणी सर्व शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे सुविधा मंजूर व्हाव्यात.
(५) महाराष्ट्र राज्यातील कर्मचारी ग्रामपंचायत यांना सर्व शासकीय सुविधांसह वेतन श्रेणीसाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ६१ हे शिथिल करावे व वसुलीच्या टक्केवारीवर वेतनश्रेणी मिळू नये अर्थात १००% वेतनश्रेणी मंजूर व्हावी, यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील आर्वी, आष्टी, कारंजा तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत झालेली कामे निकृष्ठ दर्जाची झाल्याबाबत

**(९) ५६४५० (२१-०१-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी, आष्टी व कारंजा (जि. वर्धा) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत गेल्या २ ते ३ वर्षामध्ये शासनाने कोटयवधी रुपयांचा निधी खर्च केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्वी-शिरपुर रस्ता पहिला टप्पा, आर्वी-शिरपुर-टाकरखेडा रस्ता दुसरा टप्पा, कवाडी-गव्हाणखेडी रस्ता, ता. आर्वी, राजणी-नारा, ता. कारंजा या रस्त्याचे दोन वर्षापूर्वी कामे करण्यात येऊनही रस्त्याची दुरवस्था झाली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्यामध्ये कंत्राटदार व अधिकारी यांनी मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार करून निधीचा अपव्यय केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुषंगाने आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत झालेल्या रस्त्याच्या कामाची उच्च स्तरीय चौकशी करून कंत्राटदार व अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अशी बाब आढळून येत नाही.

(४) व (५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधकाम योजनेतील निधी अभावी प्रलंबित कामांबाबत

**(१०) ५७४६० (२६-०४-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१८ मध्ये ज्या ग्रामपंचायतींना स्वतःची इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना इमारत बांधकामासाठी स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधकाम योजनेतून निधी उपलब्ध करून दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त योजनेतंर्गत ज्या ग्रामपंचायतींना स्वत:ची इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना या योजनेतून स्वत:ची इमारत बांधून देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेतंर्गत आर्थिक वर्ष २०२२- २०२३ मध्ये बीड जिल्ह्यातील २१८ ग्रामपंचायत बांधकामांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी १४४ ग्रामपंचायत बांधकामास अद्याप एक रुपयाही निधी प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सोलापूर जिल्हयात अद्यापही सुमारे १४७ ग्रामपंचायतींना स्वत:ची इमारत नसतांना सुध्दा शासनाचे या योजनेकडे दुर्लक्ष झाले असून याबाबतच्या तक्रारी तेथील ग्रामस्थानी शासनाकडे वारंवार केलेल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने मंजूर ग्रामपंचायतीच्या बांधकामासाठी शासन निर्णयाप्रमाणे टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध देण्याबाबत सातत्याने मागणी केली जात असल्याने उक्त ग्रामपंचायतींस निधी उपलब्ध करुन देवून सदरहू ग्रामपंचायतीचे बांधकाम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१), (२) होय, हे खरे आहे,

(३) अशंत: खरे आहे,

बीड जिल्ह्यातील मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत २४३ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामांना मंजुरी देण्यात आलेली असून जिल्हा परिषदेच्या निधी मागणीनुसार निधी वितरीत केला जातो.

(४) व (५) सोलापूर जिल्ह्यातील मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत ३६ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामांना मंजुरी देण्यात आलेली असून जिल्हा परिषदेच्या निधी मागणीनुसार निधी वितरीत केला जातो.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाठोडा शुक्लेश्वर ते म्हैसपूर (ता.भातुकली, जि.अमरावती) येथील रस्त्याचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(११) ५७८७८ (२४-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाठोडा शुक्लेश्वर ते म्हैसपूर (ता.भातुकली, जि.अमरावती) येथील रस्त्याचे काम अपूर्ण केल्यामुळे अतिवृष्टीत रस्ता अत्यंत खराब होऊन नागरिकांना ये-जा करणे अत्यंत त्रासदायक होत आहे तसेच, भविष्यात जिवितहानी होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम नागरिकांच्या सोयीकरता तात्काळ करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती यांना दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर रस्त्याचे काम त्वरीत पूर्ण करुन भविष्यात होणारी दुर्घटना टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१२-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) म्हैसपूर ते वाठोडा शुक्लेश्वर हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१० दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे.

जिल्हा वार्षिक योजना (३०५४) सन २०२०-२१ अंतर्गत सदर रस्त्याच्या सा.क्र.१/०० ते १/८०० या लांबीमध्ये रु.२५ लक्षच्या मंजूर अनुदानातून दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत सा.क्र.१/८०० ते ३/०० या लांबीच्या दुरुस्तीकरीता रु.२८ लक्षचे काम मंजूर असून सदर काम प्रगतीत आहे. उर्वरित रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना (३०५४) अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे रेवसा (ता.जि.अमरावती) येथील गुरु गजानन धाम मध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत**

**(१२) ५७८८२ (०३-०५-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रेवसा (ता.जि.अमरावती) येथील गुरु गजानन धाम वस्तीत १२० कुटूंब राहत असून २४० नविन घरांचे बांधकाम सुरु असून स्थानिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वस्तीमधील कुटुंबाना दैनंदिन वापराकरीता व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा नवसारी जलकूंभामधून करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, जिल्हा अमरावती यांना दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त वस्तीस नवसारी जलकुंभामधून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनानकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२९-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नवसारी येथे असलेला जलकुंभ अमरावती महानगरपालीके अंतर्गत येत असल्यामुळे गुरू गजानन धाम वस्तीकरिता नवसारी जलकुंभावरून पाणी देणे शक्य नाही. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत १०५ गावे वाढीव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये सदर मौजे रेवसा येथील गुरू गजानन धाम वस्ती समाविष्ट असून सदर कामे प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे तेर (ता. जि. धाराशिव) येथील कै. रामलिंगप्पा पुराण वस्तू संग्रहालयाचे अपूर्ण काम पूर्ण करण्यास निधी मिळणेबाबत

**(१३) ५८०९१ (२७-०४-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तेर (ता. जि. धाराशिव) येथील कै. रामलिंगप्पा पुराण वस्तू संग्रहालय पर्यटन निवासाचे (भक्तनिवास) अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी पर्यटन स्थळांच्या विकास कार्यक्रमांतर्गत रु.१.६१ कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी दिनांक १७.११.२०२२ रोजी वा त्यासुमारास वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संत श्रेष्ठ श्री. संत गोरोबा काका यांचा सहवास लाभलेल्या तेर नगरीला ऐतिहासिक व धार्मिक वारसा असून येथे अनेक प्राचीन मंदिरे असून पुरातत्वीय अवशेष सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कै. रामलिंगप्पा पुराणवस्तू संग्रहालयामध्ये पुरातन काळातील २५,००० पेक्षा जास्त अवशेष ठेवण्यात असून या वस्तू संग्रहालयाला देश-विदेशातील अनेक पर्यटक भेट देतात. तसेच तेर हे वैराग्य महामेरू संत श्रेष्ठ श्री गोरोबा काकांचे ‘ब’ वर्ग दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्र असून दर वर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पर्यटक व भाविकांच्या राहण्याची सोय व्हावी, यासाठी येथे पर्यटक निवास (भक्तनिवास) बांधण्यासाठी रु.६० लक्ष निधी मंजूर करण्यात आला होता, प्रत्यक्षात काम करताना तेरणा नदी काठालगत खोलवर काळी माती असल्यामुळे इमारतीच्या पायाच्या कामांमध्ये पाईल कॅपचे काम करताना त्यांना एकमेकांना चारही बाजूंनी स्ट्रीप फौडेशन करून जोडल्यामुळे किमतीत वाढ झाली व मंजूर निधी मध्ये या इमारतीचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे अनेक वर्षापासून सदरील इमारत अपूर्ण असून वापराविना आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने उक्त इमारतीची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजपत्रक तयार केले असून ते शासनाकडे सादर केले आहे व यासाठी रु. १.६१ कोटीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने सदरील पर्यटन निवासाचे (भक्तनिवास) उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी पर्यटन स्थळांच्या विकास कार्यक्रमांतर्गत रु. १.६१ कोटी निधी मंजूर करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१३-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

तेर हे वैराग्य महामेरू संत श्रेष्ठ श्री गोरोबा काकांचे 'ब' वर्ग दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्र असून दर वर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात.

(४) (५) (६) १. मौजे तेर ता.जि. उस्मानाबाद येथील पर्यटक निवासाचे बांधकाम (भक्तनिवास) करण्यासाठी शासन निर्णय क्र. टिडीसी २०२३/०३/प्र.क्र.५३/ पर्यटन,दिनांक ०९.०३.२०२३ अन्वये रु.२१५.९४ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रु.१०७.९७ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

२. तसेच, मौजे तेर ता. जि. उस्मानाबाद येथील श्री. संत गोरोबा काका तीर्थक्षेत्राचा विकास करण्याकरिता शासन निर्णय क्र. टिडीसी २०२३/०३/ प्र.क्र.५३/ पर्यटन,दिनांक २३/०३/२०२३ अन्वये एकूण रू. २८४.०० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रू. १४२.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आमला (ता. दर्यापूर) या संत गाडगेबाबा यांचे कर्मस्थळ तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयास निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(१४) ५८५०४ (२७-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमला (ता. दर्यापूर) येथील संत गाडगेबाबा यांचे कर्मस्थळ तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयास दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयानुसार ६.७९ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सदर विकास आराखडयाचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात सदर विकास आराखडयातील कामासाठी १.५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून तद्नंतर वारंवार निधीची मागणी केली असता अद्यापही निधी उपलब्ध करून दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२० पासून सदर आराखडयाचे काम सुरू असून अद्यापही निधीअभावी काम पूर्ण न झाल्याने या भागातील नागरिकांमध्ये नाराजी असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुसार उकत विकास आराखडयास निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) ग्रामविकास विभागाच्या दि.३१/०७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात रु.१.३५ कोटी इतका निधी वितरीत केला आहे. तसेच दि.१/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दुस-या टप्प्यात रु.२.६७ कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, अमरावती यांना वितरीत करण्यात आला आहे. या रु.२.६७ कोटी रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडून शासनास प्राप्त न झाल्याने उर्वरित निधी वितरीत केलेला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री.सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान सामदा (काशीपूर) ता. दर्यापूर या "ब" वर्ग तीर्थक्षेत्रास निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(१५) ५८५१६ (२५-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री. सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान सामदा (काशीपूर) (ता. दर्यापूर) या तीर्थक्षेत्र कोळयांची काशी म्हणून प्रसिद्ध असून या तीर्थक्षेत्रास ग्रामविकास विभागाच्या दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयानुसार "ब" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा विकास होण्याच्या दृष्टीने निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०६-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२) ग्रामविकास विभागाच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु.२.०० कोटीच्या मर्यादेत अंदाजपत्रकीय प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत, दिनांक १५/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. जिल्हा परिषदेकडून याबाबतचा प्रस्ताव/अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयात तसेच भोकर तालुक्यातील (जि.नांदेड) कामगारांना मध्यान्ह भोजन पुरिवण्यात न आल्याबाबत**

**(१६) ५८६२५ (०३-०५-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या कालावधीत बांधकाम कामगारांची जेवणासाठी होणारी गैरसोय थांबविण्यासाठी तत्कालीन कामगार मंत्र्यानी जुलै, २०२२ मध्ये मध्यान्ह भोजन योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयात १ लाख ६४ हजार नोंदणीकृत कामगार मजूर असल्याची नोंद सोलापूर कार्यालयात आहे त्यापैकी ४२ हजार कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित असतांना अनेक ठिकाणी कामगारांना भोजन पुरविण्यात आले नसल्याची बाब दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच भोकर (जि.नांदेड) तालुक्यात बांधकाम कामगारांना शासनातर्फे देण्यात येणारे मध्यान्ह भोजन हलक्या दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली तसेच उक्त कामगारांना नियमित मध्यान्ह भोजन देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१२-०७-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्य शासनाने माहे मार्च, २०१९ मध्ये मध्यान्ह भोजन योजना सुरु केली असून दिनांक १९.१०.२०२१ पासून सोलापूर जिल्हयात बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना सुरु करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयामध्ये नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या १,५९,०४६ इतकी असून आजमितीस ६०९८४ नोंदीत सक्रिय बांधकाम कामगार आहेत. सन २०२२ मध्ये प्रति दिन सुमारे ४२,००० बांधकाम कामगारांना जेवण देण्यात आले आहे.

विविध बांधकाम संघटनांकडून अथवा विकासकाकडून किंवा बांधकाम ठेकेदारांकडून मध्यान्ह भोजन पुरविण्याबाबत मागणी केल्यानंतर सदर ठिकाणी पाहणी करुन/खातरजमा करुन मध्यान्ह भोजन पुरविण्यात येते.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आदेशान्वये ठरवून दिलेल्या मेनूप्रमाणे व निश्चित केलेल्या प्रमाणानुसार मध्यान्ह भोजनाचा पुरवठा केला जातो. तसेच, मध्यवर्ती स्वयंपाकगृहामध्ये तयार होणाऱ्या अन्नपदार्थाची श्री.अॅनॅलिटीकल टेस्टिंग अॅन्ड रिसर्च लॅबरोटरी, जळगाव या प्रयोगशाळेतून वेळोवेळी तपासणी करण्यात आलेली असून स्वयंपाकगृहात तयार होणारे अन्न खाण्यायोग्य असल्याचा अहवाल दिलेला आहे.

नांदेड जिल्हयात सदरहू योजनेंतर्गत कामगारांना मध्यान्ह भोजन देत असताना कंत्राटदारांकडून हलक्या दर्जाचे भोजन वाटप करण्यात येत असल्याबाबत कोणतीही तक्रार कामगारांकडून सहायक कामगार आयुक्त कार्यालय, नांदेड या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(१७) ५८७३० (०३-०५-२०२३). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध शिक्षक संघटनांनी १७ जानेवारी, २०२३ पासून चिमूर पंचायत समितीच्या अंतर्गत बेमुदत साखळी उपोषण करण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१- २२ मधील आयकर कपात रकमेतील घोळ दूर करून, चुकीचे पॅन नंबर अद्यावत करण्यात यावे, गहाळ मासिक आयकर रक्कम जमा करण्यात यावी, प्रशासनाच्या चुकीमुळे आयकर रक्कम विलंबामुळे शिक्षकावर येणारे अतिरिक्त व्याज प्रशासनाने भरावे, डीसीपीएस धारक शिक्षकांच्या खात्यावर डीसीपीएस रक्कम जमा करण्यात यावी, शिक्षकांचे सेवा पुस्तक, वरिष्ठ वेतन श्रेणी, आदर्श शिक्षक पुरस्कार पडताळणीसाठी जिल्हा परिषदेला पाठविण्यात यावे, शिक्षकांचे सेवा पुस्तक अद्यावत करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात यावे ,पतसंस्था ,एलआयसी ,जीपीएफ यांची कपात नियमित पाठवण्यात यावे, सेवानिवृत्त शिक्षकांचे उपदान अंश राशीकरण व सातव्या वेतन आयोगाचा हप्ता देण्यात यावा, अंश राशीकरण रकमेचा लाभ न देता हप्ता कपात करू नये. यासह इतर मागण्यांचे निवेदन तहसीलदार चिमूर यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त शिक्षकांच्या  मागण्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-०६-२०२३) :** (१) होय, अशंत: खरे आहे.

(२) अशंत : खरे आहे.

(३) कार्यवाही केलेली आहे.

(४) लागू नाही.

---

## शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) कसारा भागातील नारळवाडी, पारधवाडी, गोलभण येथे होत असलेल्या पाणी टंचाईबाबत

**(१८) ५८७७७ (०३-०५-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यातील ( जि.ठाणे ) कसारा भागातील नारळवाडी, पारधवाडी, गोलभण येथील विहिरींनी तळ गाठला असल्याची बाब पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी केलेल्या पाहणीत दिनांक.१०.१.२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भागातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता चारशे कोटी रुपयांची भावली पाणी योजना राबविण्यात येत असून यातील ५० कोटी रुपये खर्च होऊनही अद्याप एक थेंबभरही पाणी मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर गावांतील पाणी टंचाई दूर करण्याकरिता तसेच भावली पाणी योजना पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

कसारा भागातील नारळवाडी, पारधवाडी व गोलभण गावात पाणी टंचाईबाबत पंचायत समिती, शहापूर यांच्याकडील पाणी पुरवठा विभागाचे शाखा अभयंता यांनी प्रत्यक्ष पहाणी करुन टँकरने पाणी पुरवठा करणेबाबतचा अहवाल दिनांक ०३.०१.२०२३ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहापूर यांच्याकडे पाठविण्यात आला. सदर अहवालाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहापूर व तहसिलदार शहापूर यांच्या संयुक्त स्वाक्षरीने उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांना पाणी टंचाई प्रस्ताव दिनांक ०६.०१.२०२३ रोजी पाठविण्यात आला. सदर गावातील पाणी टंचाई दुर करण्यासाठी सद्यस्थितीत टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे.

(२) अंशत खरे आहे.

शहापूर तालुक्यातील ९७ गावांसाठी भावली धरण उद्भव घेऊन गुरुत्वाकर्षणावर आधारीत रु.३१६.४२ कोटी इतक्या रकमेच्या दिनांक २८.०४.२०२२ च्या शासन निर्णयान्वये नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, योजनेच्या कामाचे कार्यादेश दिनांक ०४.०८.२०२२ रोजी देण्यात आले आहेत. योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) सदर गावातील पाणी टंचाई दुर करण्यासाठी सद्यस्थितीत टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नोकरभरतीसाठी शासनाने नेमलेल्या कंपन्यांची परीक्षा घेण्याची क्षमता नसल्यामुळे भरती प्रलंबित असल्याबाबत

**(१९) ५८८७३ (०२-०५-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने पदभरतीसाठी ऑन लाईन परीक्षा आयोजित करण्यासाठी टीसीएस व आयबीपीएस या कंपन्यांनी निवड केली असून माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये जिल्हा परिषदांमधील आरोग्य विभागाच्या पाच संवर्गाच्या भरतीचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपन्यांची लाखो विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याची क्षमता नसल्यामुळे भरती प्रक्रिया राबवू शकण्यास असमर्थ असल्याबाबत राज्यातील काही जिल्हा परिषदांनी शासनाला कळविले आहे काय,

(३) असल्यास, शासनाने भरती प्रक्रिया राबविण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) होय. जिल्हा परिषदेंतर्गत गट-क मधील आरोग्य व इतर संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम विभागाच्या दि.२१.१०.२०२२ व दि.१५.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आला होता. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परिक्षा टि.सी.एस./ आय.बी.पी.एस. या कंपन्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत.
(२) राज्यातील काही जिल्हा परिषदांनी TCS / IBPS या कंपन्यांशी संपर्क केला असता सदर कंपन्यांची संपूर्ण राज्यात एकाच वेळी परीक्षा घेण्याची सात ते आठ हजार विद्यार्थी क्षमता असल्याचे त्यांनी कळविले होते. सदर प्रकरणी, जलद पदभरतीसाठी दि.१२.०२.२०२३ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या सचिव समितीच्या बैठकीत चर्चा झाली. सदर कंपन्यांची एकाच वेळी परीक्षा घेण्याच्या क्षमता वर्धन करिता सदर कंपन्यांना शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक प्रणाली भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्याची शिफारस सचिव समितीने केली आहे. त्यानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांना दि.१७ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन पत्रान्वये क्षमता वर्धनकरिता संगणक प्रणाली भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आलेली आहे.
(३) आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्यात आला असून त्यानुषंगाने Application Portal विकसित करुन लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गिरवली (आपेट) (ता. अंबाजोगाई, जि.बीड) येथील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेबाबत

**(२०) ५८८८२ (०९-०५-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरवली (आपेट), (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजुर झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना हाती घेताना विहिरीची जागा निवडताना चुकीची निवडण्यात आली असून गिरवली शिवारात सर्वत्र कठिण खडक असून परिसरात कोठेही पाणी लागत नाही. ग्रामपंचायतीच्या दृष्टीने केवळ अंबलवाडी धरणातून गावाला शाश्वत उदभवाची योजना होऊ शकते त्यादृष्टीने पुर्न सर्व्हेक्षण करणेबाबत तसेच निविदा करार झाला म्हणून कामे हाती घेतले तर खर्च वाया जाण्याचीच दाट शक्यता आहे. तेंव्हा सदर ठिकाणी विहिरीला पाणी लागल्याशिवाय इतर कामे हाती न घेण्याबाबत तसेच खात्री करून कामे हाती घेण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे पाणीपुरवठा मंत्री व मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. यांचेकडे दिनांक ०७/०१/२०२२ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०१-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मौ-गिरवली (आपेट), ता. अंबाजोगाई या गावासाठी वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी दिलेल्या उद्भव प्रमाणपत्रानुसार सर्व्हेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु. १०५.७५ लक्ष ढोबळ किंमतीस जिल्हा परिषद स्तरावर तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देवून नळ पाणी पुरवठा योजनेचे कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. सद्य:स्थितीत, योजनेचे काम संबंधित ठेकेदाराने सुरु केलेले नाही. सदर योजनेच्या प्रथम उद्भवाचे काम विकसित झाल्यानंतर व त्यास प्रकल्पीत लोकसंख्येस पाणी उपलब्ध झाल्यानंतरच योजनेच्या इतर उपांगाची कामे हाती घेण्यात येतील. सदर योजनेचे काम शासन निकषाप्रमाणे करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुहागर येथील जलजीवन मिशन योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(२१) ५८८९२ (०३-०५-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर विधानसभा क्षेत्रातील जलजीवन मिशन योजनेतून मंजूर झालेली कामे ही काही ठेकेदारांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून वाढीव दराने घेतली असल्याचे शासनाच्या निदर्शनास आली आहेत काय,

(२) असल्यास, सदर कामांचा ठेका घेवून ती स्वतः न करता ठेकेदारांनी पोटमक्तेदार नेमले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्हयातील नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामांच्या निविदा या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर Online प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. शासनाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, विहीत पध्दतीनुसार कमीत कमी दराच्या निविदेस स्वीकृत करुन मक्तेदारास कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

रत्नागिरी जिल्हयात मक्तेदारांची संख्या कमी असल्यामुळे निविदांना प्रतिसाद मिळत नसल्यामुळे काही कामांच्या निविदांची दोन ते तीन वेळा तर काही निविदांची दहा ते अकरा वेळेस पुन्हा मागणी करण्यात आली आहे. मागणी अंती एकच मक्तेदार उपलब्ध झाला. तसेच काही निविदांना स्पर्धा न झाल्यामुळे मक्तेदारांनी जादा दराने निविदा भरल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भीषण पाणीटंचाईला आळा घालण्यासाठी भावली पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत**

**(२२) ५९१५० (०३-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भीषण पाणीटंचाईला आळा घालण्यासाठी भावली पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी जमीन अधिग्रहण जागा निश्चिती व इतर परवानग्या घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे याबाबत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार उक्त तालुक्याला भेडसावणारी पाण्याची समस्या सोडविण्यासाठी भावली योजना त्वरीत कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-०६-२०२३) :** (१) व (२) शहापूर तालुक्यातील ९७ गावांसाठी भावली धरण उद्भव घेऊन गुरुत्वाकर्षणावर प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या जलसंपदा विभाग, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या विभागांच्या आवश्यक परवानग्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आले असून, मंजूरीबाबत पाठपुरावा सुरु आहे.

(३) शहापूर तालुक्यातील ९७ गावांसाठी भावली धरण उद्भव घेऊन गुरुत्वाकर्षणावर आधारीत रु. २८१.९८ कोटी इतक्या रकमेच्या मुळ व रु. ३१६.४२ कोटी इतक्या रकमेच्या सुधारीत किंमतीच्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेस मंजूरी देण्यात आली आहे.

सदर योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, योजनेच्या कामाचे कार्यादेश दिनांक ०४.०८.२०२२ रोजी देण्यात आले आहेत. योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जागतिक बँकेच्या सहकार्यातून मॉडेल आयटीआय, मुलींसाठी मॉडेल आयटीआय उभारण्याबाबत**

**(२३) ५९१५२ (२७-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जागतिक बँकेच्या सहकार्यातून मॉडेल आयटीआय, मुलींसाठी मॉडेल आयटीआय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मॉडेल आयटीआय प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१२-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचा शासन निर्णय क्र.जाबँप्र-२०२३/प्र.क्र.०६/व्यशि-४ दिनांक ०८ जून, २०२३ अन्वये राज्यातील व्यावसायिक शिक्षण व कौशल्यवृद्धी आणि त्यासाठीच्या आवश्यक पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी Development Of Applied Knowledge and Skill for Human Development (DAKSH) या तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये "मॉडेल आयटीआय" हा घटक अंतर्भूत आहे. यांतर्गंत राज्यातील सर्व जिल्ह्यातील प्रत्येकी १ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि मुलींसाठी १५ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अशा एकूण ५१ (३६ + १५) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा "मॉडेल आयटीआय" म्हणून विकास करण्यात येणार आहे.
(३) महाराष्ट्र कौशल्य विकास प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प आराखडा बनविण्याचे काम सुरु आहे. याचाच एक भाग असलेल्या मॉडेल आयटीआय या घटकामध्ये अंतर्भूत कराव्या लागणाऱ्या बाबी (उदा. इंडस्ट्री ४.० साठीची आवश्यक अभ्यासक्रम निर्मिती, इन्क्युबेशन सेंटर, अद्ययावत वर्कशॉप, व्हर्चुअल कौशल्य प्रशिक्षण व लँगवेज सुविधा, संशोधन, समुपदेशन मार्गदर्शन व करिअर केंद्र इ.) यांची निश्चिती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) सदर प्रकल्पाच्या "प्राथमिक प्रकल्प अहवाल (Preliminary Project Report)" यास केंद्र शासनाच्या आर्थिक कार्य विभागाने दि.०९ मार्च, २०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन राज्य शासनाने दिनांक ०८ जून, २०२३ अन्वये या प्रकल्पास तत्वत: मान्यता दिलेली आहे.

---

**राज्यातील बांधकाम कामगार व कुटूंबियांच्या सर्वांगिण विकासासाठी महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाकडून कार्यवाही करणेबाबत**

**(२४) ५९१५६ (०३-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बांधकाम कामगार व कुटूंबियांच्या सर्वांगिण विकासासाठी महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या प्रशासकीय खर्च ५७ टक्के असून योजनांवर केवळ ३९ टक्के खर्च होत असून कामगारांवर अत्यल्प खर्च होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने बांधकाम कामगार व कुटुंबियांच्या सर्वांगिण विकासासाठी तरतुद करण्यात आलेला निधी त्यांच्यासाठी खर्च होण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (३०-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा होत असलेल्या उपकर रकमेमधून मंडळांतर्गत नोंदीत जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक सहाय्य योजना, आरोग्य विषयक योजना, सामाजिक व इतर सुरक्षा योजना आणि आर्थिक सहाय्य योजना अशा एकूण ३२ विविध कल्याणकारी योजनांच्या लाभवाटपावर खर्च करण्यात येतो.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील कलम २४ (३) अन्वये वेतन भत्ते, मानधन, बैठका व अन्य प्रशासकीय बाबींवरील खर्च आर्थिक वर्षातील योजनांवरील खर्चाच्या ५ टक्के च्या मर्यादेत असावा, अशी तरतूद आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ या कालावधीत मंडळामार्फत प्रशासकीय बाबींवर रु.६४.४८ कोटी एवढा खर्च झाला असून सदरचा खर्च मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजनांवर झालेल्या खर्चाच्या १.६३ टक्के इतका आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगी गडावर मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२५) ५९१६० (२५-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील महाराष्ट्राचे अराध्यदैवत आणि शक्तीपीठ म्हणून जनमानसात श्रध्देचे प्रमुख स्थान असलेल्या सप्तशृंगी गडाच्या सर्वांगिण विकासासाठी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, उक्त गडाच्या विकास आराखड्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार गडावर दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात तसेच विकास आराखड्याची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०६-२०२३) :** (१) सदर प्रकरणी कार्यवाही सुरू आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सादर केलेल्या श्रीक्षेत्र सप्तश्रृंगी देवी, वणी ता. कळवण या तीर्थक्षेत्रांचा रू.१९.७२ कोटी इतक्या रक्कमेच्या विकास आराखडयास मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने दि.१९.०७.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर आराखड्यास मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर बैठकीसाठी दिनांक व वेळ देण्यासाठी नस्ती मा. मुख्यमंत्री कार्यालयास सादर करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## जिल्हा परिषद अहमदनगर आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांची रिक्त पदे असल्याबाबत

**(२६) ५९२६३ (०३-०५-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अंतर्गत १८ प्राथमिक आरोग्य केंद्र व ५५५ केंद्र असून गेल्या आठ वर्षापासून जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांची भरती झाली नसल्याने निम्याहून अधिक पदे रिक्त असल्याचे दिनांक १८/ १/ २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी, व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या १८६२ मंजूर पदापैकी ९२१ पदे रिक्त आहेत. तसे जिल्हा रुग्णालयात मंजूर ४०५ आरोग्य अधिकारी / कर्मचारी पैकी १०६ पदे रिक्त आहेत. जिल्हा रुग्णालयात ५०० बेडची आवश्यकता असतांना केवळ २५० बेड उपलब्ध असल्याने रुग्णांना जमिनीवर गादी टाकून उपचार केले जातात हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जिल्ह्यात पन्नास लाख लोकांच्या आरोग्यासाठी अवघे १००० कर्मचारी असल्यामुळे त्यांना सेवा देताना अडचणी निर्माण होत असून रुग्णांवर त्याचा दुष्परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य सेवेसाठी वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक -सेविका, परॉमेडीकल स्टाफ, मंजूर पदे भरुन व आवश्यक बेड व वैद्यकीय साहित्य देवून आरोग्य सेवा सुरळीत व शाश्वत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर अंतर्गत १०२ प्राथमिक आरोग्य केंद्र असून ५५५ उपकेंद्र आहेत. जिल्हा परिषद, अहमदनगर अधिनस्त आरोग्य विभागातील नियमित पदभरती सन २०१६ यावर्षी झालेली आहे. त्यानंतरच्या काळात काही संवर्गातील पदे अनुकंपा, ग्रामपंचायत व आंतरजिल्हा बदली इ. द्वारे भरण्यात आलेली आहेत.

(२) व (३) हे खरे नाही. सद्यस्थितीत सरळसेवेची आरोग्य सेवक पुरुष मंजूर पदे ५७१ असून, भरलेली पदे २१९ व रिक्त पदे ३५२ आहेत.

* आरोग्य सेवक महिला मंजूर पदे ९८९ असून, भरलेली पदे ४१६ व रिक्त पदे ५७३ आहेत.
* औषध निर्माण अधिकारी मंजूर पदे १०२ असून, भरलेली पदे ७५ व रिक्त पदे २७ आहेत.
* आरोग्य सहाय्यक पुरुष मंजूर पदे १३४ असून, भरलेली पदे १२१ व रिक्त पदे १३ आहेत.
* आरोग्य सहाय्यक महिला मंजूर पदे १०७ असून, भरलेली पदे ६६ व रिक्त पदे ४१ आहेत.
* प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी मंजूर पदे १४ असून, भरलेली पदे ११ व रिक्त पदे ३ आहेत.
* वैद्यकीय अधिकारी मंजूर पदे २०७ असून, भरलेली पदे १७२ व रिक्त पदे ३३ आहेत.

जिल्हा रुग्णालयात २८२ खाटा मंजूर असून दररोज अंदाजे ५०० पेक्षा जास्त रुग्ण उपचारासाठी येतात. त्यामुळे रुग्णांना इतरत्र उपचाराकरीता आवश्यक व्यवस्था करण्यात येते.

(४) जिल्हा परिषद, अहमदनगर अधिनस्त गट-क संवर्गातील आरोग्य विभागाची पदे व इतर रिक्त पदे सरळसेवेने भरणेची कार्यवाही ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.२१.१०.२०२२ व दि.१५.११.२०२२ अन्वये करण्यात येत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र येथे आवश्यक बेड व वैद्यकीय साहित्य दिलेली आहेत. त्याद्वारे आरोग्य सेवा सुरळीत करणेची कार्यवाही करणेत येत आहे. जिल्हा रुग्णालयात आरोग्य व्यवस्था सुरळीत चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा परिषद मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी निविदा प्रक्रियेमध्ये अपहार केल्याबाबत**

**(२७) ५९२६४ (०३-०५-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदे मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी निविदा प्रक्रिया राबवताना ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने काम वाटपात अनियमितता केल्याचे दिनांक १८.०१.२०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार उक्त कामाच्या वाटपात अनियमितता करणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१५-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलजीवन मिशन योजनेअंतर्गत (ता.उमरखेड, जि. यवतमाळ) येथील प्रादेशिक पाणी पुरवठा (वॉटर ग्रीड ) या योजनेच्या व्यवहार्यता अहवालाबाबत**

**(२८) ५९३४० (०३-०५-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलजीवन मिशन योजनेअंतर्गत उमरखेड व महागांव तालुक्यातील (जि. यवतमाळ) उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या इसापूर धरण येथील प्रादेशिक पाणी पुरवठा (वॉटर ग्रीड ) या योजनेचा व्यवहार्यता अहवाल सादर करण्याचे आदेश दिनांक.१७.१.२०२३ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांना दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार सदरील अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालानुसार या योजनेस मान्यता देण्यात आली आहे काय, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदरचा अहवाल शासनास दि.३०.०५.२०२३ रोजी प्राप्त झाला आहे. तथापि, उमरखेड तालुक्यातील ११४ गावे व महागांव तालुक्यातील ९२ गावांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्यामार्फत कामे सुरु आहेत. या २०६ गावाच्या योजनांकरिता जमिनीमध्ये पाणी उपलब्ध असल्याबाबतचे प्रमाणपत्र भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा द्वारे घेण्यात आले आहे. त्यानुसार जल जीवन मिशनच्या निकषानुसार ५५ लिटर प्रती व्यक्ती प्रति दिन प्रमाणे योजना मंजूर करून कामे सुरु आहेत.

---

**बीड जिल्ह्यात टँकरने पाणी पुरवठा करण्याच्या कामात झालेली अनियमितता**

**(२९) ५९३५६ (०३-०५-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात सन २०१७ ते मार्च, २०२१ या कालावधीत जिल्ह्यातील ग्रामस्थ व नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा करण्याची निविदा वतन ट्रान्सपोर्ट, लातूर या कंत्राटदारास दिल्याप्रकरणी पावसाळी अधिवेशन, २०२२ मध्ये विचारलेल्या

तारांकित प्रश्नावरील चर्चेच्यावेळी मा.मंत्री, पाणीपुरवठा यांनी प्रश्नाधीन बाबतीत मा.सदस्य यांनी दिलेली माहिती सत्य मानून विभागीय आयुक्तामार्फत चौकशी करण्यात येईल आणि चौकशीत आढळून आलेल्या निकषानुसार संबंधित दोषींवर कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोट्यवधी रुपयाचा गैरव्यवहार होऊन संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांनी शासनाची आर्थिक लूट केल्याप्रकरणी व तत्ससंबंधात जिल्ह्यातील ग्रामस्थ नागरिकांना शासनाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने अद्याप कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषीं अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२३-०६-२०२३) :** (१) होय,
(२) व (३) हे खरे नाही.

यासंदर्भात मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.१०.२०२२ रोजी बैठक घेण्यात आली आहे. सदर बैठकीतील निर्णयानुसार वतन ट्रान्सपोर्ट, लातूर या फर्मला काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येऊन टँकर पाणी पुरवठा ठेकेदार यांच्या विरोधात फौजदारी कारवाई करणेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी प्राधिकृत केले आहे.

दरम्यान यासंदर्भात संबंधित ठेकेदाराने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट याचिका क्रमांक ६४/२०२३ दाखल केली असता सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिनांक ०४ जानेवारी, २०२३ रोजी सुनावणी पूर्ण होईपर्यंत याचिकाकर्ता यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई करु नये असे आदेशित केले होते. तद्नंतर दिनांक २१.०३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये संबंधित ठेकेदारास नैसर्गिक न्याय तत्वाचा अवलंब करुन सुनावणीची संधी देण्यात यावी व तद्नंतर आदेश पारित करावा असे मा. उच्च न्यायालयाने आदेशित केले. त्यानुसार सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दिनांक १९.०५.२०२३ रोजी ठेकेदारासमवेत सुनावणी घेतली असून करारानाम्यातील अटीनुसार सदर प्रकरण जिल्हाधिकारी, बीड यांच्या निर्णयास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयाकडून सादर करण्यात आले आहे.

तसेच, या प्रकरणी संबंधित गट विकास अधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलजीवन मिशन अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गांवाना नळाव्दारे पाणी देण्याच्या कामास जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने सुरुवात केल्याबाबत

**(३०) ५९४०६ (०३-०५-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जल जीवन मिशन अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण ७४१ महसूल गावांपैकी ६६६ महसूली गावांमधील ग्रामस्थांना नळाव्दारे प्रतिमाणसी ५५ लिटर पाणी देण्याच्या योजनेच्या कामास जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेला शासनाने माहे मार्च, २०२४ पर्यंत मुदत दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे तसेच जिल्ह्यातील उर्वरित महसूली गावांमध्येही सदर योजना सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत ६६५ नळ पाणी पुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली आहे.

(२) राज्यात जल जीवन मिशन योजनेअंतर्गत मार्च २०२४ पर्यंत घरगुती नळ जोडण्या देण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(३) सिंधुदुर्ग जिल्हयातील ६६५ योजनांच्या कामांना रु. ४२९.४५ कोटी इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातील ७४१ महसूली गावांपैकी ७३२ महसुली गावांचा जल जीवन मिशन आराखडयात समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी ०९ गावांमध्ये अस्तित्वातील योजनेव्दारे पाणी पुरवठा होत असल्याने त्यांचा कृती आराखडयात समावेश करण्यात आला नाही. सदर गावांना ५५ लिटर प्रमाणे शुध्द पाणी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे. गजवडी ते जानाईदेवी मंदिर (गजवडी) (ता,जि. सातारा) या रस्त्याच्या कामाला मान्यता मिळूनही अद्याप सुरुवात झाली नसल्याबाबत

**(३१) ५९४१२ (०२-०५-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गजवडी ते जानाईदेवी मंदिर (गजवडी) (ता,जि. सातारा) या रस्त्यास प्रशासकीय मान्यता माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मिळाली असून रस्त्याच्या कामाला अद्यापही सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषांगाने उक्त रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१२-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) मौजे गजवडी ते जानाईदेवी मंदिर (गजवडी) (ता.जि.सातारा) हा रस्ता "इजिमा ६१ ते गोळेवाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्र.११०" व "प्रजिमा २९ ते बळीपवाडी गजवडी पोहच रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१११" या दोन रस्त्यांमध्ये समाविष्ट आहे.

जिल्हा वार्षिक योजना (३०५४-२०५२) ग्रामीण मार्ग विकास व मजबुतीकरण या योजनेतंर्गत सदर रस्त्यांच्या एकूण रु.५० लक्षच्या कामास मंजूरी मिळाली आहे. सदर दोन्ही कामांची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून सदरचे काम प्रगतीत आहे. तसेच सदर काम विहित मुदतीत पूर्ण करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे तालुक्यातील आर्णी ते फागणे रस्त्याची दुरुस्ती व नुतनीकरण करणेबाबत

**(३२) ५९६६७ (२५-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील आर्णी ते फागणे तसेच उभंड ते पिंपरखेड या रस्त्यांची मोठया प्रमाणावर दुरवस्था झाली असल्याने परिसरातील शेतकरी तसेच नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर रस्त्यांचे डांबरीकरण व नुतणीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) धुळे तालुक्यातील फागणे ते आर्णी हा ग्रामीण मार्ग २५ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याचा फागणे गावाकडून प्रथम १५० मीटर कॉंक्रीट पृष्ठभाग असून सुस्थितीत आहे. उर्वरित रस्त्याचा पृष्ठभाग खडीचा असून त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

धुळे तालुक्यातील लोणखेडी नांद्रे उंभड पिंपरखेडा ते जिल्हा हद्द हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.५१ दर्जाचा असून सदर रस्त्यावरील उंभड ते पिंपरखेडमधील लांबी ५.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करणे आवश्यक आहे.

प्रश्नांकित दोन्ही रस्त्यांचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. सद्यस्थितीत दोन्ही रस्त्यांना पर्यायी मार्ग उपलब्ध असून सदर रस्ते वाहतूकीस योग्य आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कामगार विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्याबाबत

**(३३) ६०१४२ (०४-०५-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगार विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ सन २०२१ मध्ये बरखास्त करण्यात आले असून अद्यापपर्यंतही या मंडळाची स्थापना करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळावर मंत्रालयीन स्तरावर सदस्यांची नियुक्ती व कामाची जबाबदारी तसेच इमारत बांधकाम कामगारांना सदर योजनेमार्फत मिळणाऱ्या लाभाबाबत तसेच योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मंडळ अस्तित्वात नसल्याने अनेक निर्णय लांबणीवर पडत असल्याने बरखास्त करण्यात आलेले इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ पुन्हा स्थापन करण्याबाबतची मागणी 'समर्थन' संस्थेने दिनांक ११ जानेवारी, २०२३ वा त्या सुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री, मा. कामगार मंत्री, तसेच मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात यावी अशी मागणी सर्व स्तरावरून करण्यात येत असल्याने उक्त कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १८ अन्वये शासनाच्या दिनांक ३०.०६.२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये त्रिपक्षीय मंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ च्या नियम ३५ अन्वये सदस्यांचा कार्यकाळ तीन वर्ष निश्चित केला असल्याने सदर कालावधी दिनांक ३०.०६.२०२१ रोजी संपुष्टात आलेला आहे.

(२) समर्थन या संस्थेने दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी शासनास निवेदन दिलेले आहे.

(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे पुर्न:गठण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सुरु असलेल्या नळपाणीपुवठा योजनेचे पाईप रस्त्याच्या कडेने टाकत असल्याबाबत**

**(३४) ६०१५५ (०३-०५-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेंची कामे सुरु असून कंत्राटदारांकडून रस्त्याच्या कडेने नळ पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ता रुंदीकरणाच्या वेळेस सदर पाईपलाईनचा अथडळा निर्माण होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी भविष्यात होणारे रस्त्याच्या रुंदीकरणाचा अभ्यास करुन त्या हेतूने रस्त्याचे अंतर सोडून पाईपलाईन टाकणेबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०७-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामात जिल्हयात आवश्यकतेनुसार रस्त्याच्याकडेने नळ पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्यात येत आहे.

(२) रस्त्याच्या कडेला असलेल्या ३ मीटरच्या Utility Passage (विद्युत तारा, दुरसंचार तारा व पाणी पुरवठयाच्या पाईप टाकण्याकरीता राखीव ठेवण्यात आलेली जागा) मधून पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात येत आहे.

सर्वसाधारणपणे संबंधित यंत्रणेसोबत संयुक्त पाहणी करुन, संबंधित विभाग / प्राधिकरणे यांची प्रकरणानुसार सशुल्क परवानगी घेवून संबंधितांच्या निर्देशानुसार कामे करण्यात येत असून, पाईपलाईन रस्त्याच्या खाली साधारणत: ९० से.मी. इतक्या खोलीवर टाकण्यात येत आहेत.

काही भागांमध्ये पांदण रस्त्याच्या कडेने पाईपलाईन टाकतांना भविष्यात रस्त्यांचे रुदीरकणाच्या अनुषंगाने रस्त्याचे अंतर सोडून पाईपलाईन टाकण्यात आल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील पाणीटंचाई आराखडा प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) ६०३२९ (०३-०५-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात दरवर्षी ऑक्टोबर आणि नोव्हेंबर मध्ये पाणीटंचाई कृती आराखडा तयार केला जात असून ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद अमरावती यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे पाणीटंचाईचा प्रतिमा टप्यातील आराखडा निरंक असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीटंचाईच्या दुसऱ्या टप्प्याचा आराखड्याचे नियोजन जानेवारीपासून सुरु केले जात असून प्रत्येक पंचायत समिति स्तरावर स्थानिक लोप्रतिनिधी तथा गटविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सदरहू जिल्हा परिषदेकडे सादर करण्यात येत असून अद्यापही पाणीटंचाईच्या दुसऱ्या टप्प्याचा आराखड्याचे नियोजन अधिकाऱ्याच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने उक्त जिल्ह्यातील पाणीटंचाई आराखडा मंजूर करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही,

संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयास जिल्हाधिकारी, अमरावती यांनी प्रशासकीय मंजूरी दिली असून आवश्यकतेनुसार पाणी टंचाई उद्भवणा-या गावाकरिता उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था लातूर यांनी नवीन अभ्यासक्रम आय. टी. आय. मध्ये सुरु करण्याबाबत**

**(३६) ६०४२७ (२७-०४-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योग व्यवसायात झालेल्या बदलाच्या अनुषंगाने तसेच लातूर जिल्ह्यात नवीन उद्योगाच्या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या अभ्यासक्रमात बदल करून कालबाह्य अभ्यासक्रम बदलण्याची व नवीन तंत्रज्ञानाबाबतचा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत औसा विधानसभेच्या स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लातूर जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक ०३/११/२०२२ रोजी झालेल्या आढावा बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था लातूर यांनी नवीन अभ्यासक्रम आय टी आय मध्ये सुरु करण्याबाबत प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरील प्रस्तावास मंजुरी देऊन नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१३-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय दिनांक २२.०६.२०२३ अन्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या विस्तार आराखडयात नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील भुजल पाण्याची पातळी कमी होत असल्याबाबत**

**(३७) ६०५३४ (०३-०५-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील भुजल पाण्याची पातळी कमी होत असल्यामुळे नागरिकांना भविष्यात पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार असल्याचे माहे जानेवारी २०२३, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त तालुक्यातील इमारतींच्या बांधकामामुळे तसेच मोठया प्रमाणात होणाऱ्या वृक्षतोडीमुळे या गंभीर बाबींकडे संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे भुजल पातळी कमी होत आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल तालुक्यातील भुजल पातळी कमी होण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच भुजल पातळी वाढण्यासाठी जनजागृती करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही,

पनवेल तालुक्यातील असलेल्या ५ निरीक्षण विहिरी पैकी १ निरीक्षण विहिर वगळता ४ विहिरीमध्ये पाणी पातळीत वाढ दिसुन येत आहे.

(३) वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण अलिबाग व जिल्हा परिषद, रायगड कार्यालयामार्फत भुजल पातळी वाढविण्याच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा आयोजित करण्यात येत असते. या कार्यशाळेत गट विकास अधिकारी, ग्रामसेवक, जिल्हा

परिषद शाळेतील शिक्षकांना इतर लोकप्रतिनिधींना भुजल साक्षरता व भुजल संवर्धन वाढीबाबतचे महत्व सांगण्यात येत असते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील पाण्याच्या टाकीसाठी जागेचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३८) ६०६४४ (०३-०५-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाल्हे (ता.पुरंदर,जि.पुणे) या गावाला पाणीपुरवठा करणारी पाण्याचीटाकी पुणे-पंढरपूर रस्ता रुंदीकरणात जात असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाण्याच्या टाकी साठी वाल्हे ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी गावाच्या पूर्वेला असलेल्या भवानीमाता डोंगरावरील वनविभागाच्या १४ गुंठे जागेची मागणी केली असून हा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन प्रस्तावाला तातडीने मंजूरी देऊन येथील नवीन पाण्याचे टाकीचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१९-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मौजे-वाल्हे, ता. पुरंदर गावातील अस्तित्वातील २.०० लक्ष लिटर क्षमतेच्या उंच टाकीची जागा राष्ट्रीय महामार्ग, पुणे-पंढरपूरच्या भूसंपदानामध्ये जात असल्याने सदर ठिकाणी २.०० लक्ष लि. टाकी राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत बांधून देण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाने त्यांचे वरिष्ठ कार्यालयास सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्वी (जि.वर्धा) येथील जलजीवन मिशन योजनेतंर्गत पाणी पुरवठा योजनेतील नविन कामांना मंजूरी देवून कामे सुरू करण्याबाबत

**(३९) ६०८४७ (०९-०५-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) विधानसभा मतदार संघातील जलजरवन मिशन योजनेतंर्गत ५० गावातील पाणी पुरवठा योजनेतील नविन कामांना मंजुरी देवून कामे सुरू करण्यात आली असून सदर कामे निवडक ५ ते ७ ठेकेदारांनी व अधिकाऱ्यांनी यांच्या संगनमताने करून देण्यात आली, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, पुण्याई कंन्स्ट्रक्शन आर्वी, आ.बी.ठाकरे, अकिल शहा, नितीन मानकर, बि.पी.सोनकुवर कारंजा यांना अंदाजपत्रकाच्या अगाऊ दराने देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कामावर कुठल्याही अधिकाऱ्यांचे लक्ष नसून निविदेमध्ये असलेले साहित्य वापरण्यात येत नाही, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना लोकप्रतीनीधी म्हणून सुचना करून सुध्दा कोणत्याही कामाची पाहणी करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता वरिल कंत्राटदार यांनी घेतलेल्या कामाची शासन स्तरावर चौकशी करून शासनाच्या पैश्याचा अपव्यय करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५)  असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी/ठेकेदारांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

आर्वी विधानसभा मतदार संघामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत एकूण १४२ योजना असून ई निविदा प्रसिध्द करून स्पर्धात्मक प्रकियेद्वारे वेगवेगळया ३९ ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आले आहेत.

(२) व (३) आर्वी विधानसभा क्षेत्रामधील १४२ योजनांपैकी ३१ योजना समान दराने ३९ योजना कमी दराने व ७२ योजना जास्त दराने स्वीकृत करण्यात आल्या आहेत. सदर प्रक्रिया ही कनिष्ठ अभियंता, उपविभागीय अभियंता तसेच शासनाने नेमून देण्यात आलेल्या व्यापक्यॉस पीएमसी च्या देखरेखे खाली व शासनाने नेमून दिलेल्या त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणेद्वारे योजनेची तांत्रिक तपासणी करण्यात येते व त्यानंतर देयके अदा करण्यात येते व त्यानंतर देयके अदा करण्यात येतात.

(४) व (५) होय, हे खरे आहे.

सदरच्या मागणीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाने समिती गठीत करण्यात आलेली आहे. समितीमार्फत चौकशी सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय आयटीआयमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता व प्रवेश शुल्क देण्याबाबत

**(४०)  ६०८७८ (२७-०४-२०२३).  श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :**  सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आयटीआयमध्ये अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना निर्वाहभत्ता व प्रवेश शुल्क देण्याची तरतूद असतांना प्रभारी प्राचार्यामुळे हजारो आदिवासी विद्यार्थ्यावर आर्थिक अन्याय करत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हयात १८ शासकीय आयटीआय असून बहुतांश ठिकाणी नियमित प्राचार्य नसल्याने इतरांकडे कार्यभार सोपविल्याने अनेक जिल्हाधिकारी तसेच मा. मुख्यमंत्री यांना तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१३-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) चंद्रपूर जिल्हयातील १८ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना एकात्मिक आदिवासी विकास विभागाकडून मंजूर झालेल्या यादीनुसार निर्वाह भत्याची रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागांतर्गत कसारा येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या सखोल चौकशीबाबत

**(४१) ६१११०९ (०३-०५-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागांतर्गत कसारा येथे करण्यात आलेल्या वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सखोल चौकशी करण्याचे निवेदन सरपंचानी कार्यकारी अभियंता यांना माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरमान दिले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) वाढीव कसारा नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. १५.०९ कोटी इतक्या ढोबळ किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ०४.०२.२०१४ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेच्या कामाचे कार्यादेश दिनांक १२.०८.२०१४ रोजी देण्यात आले असून, योजना दिनांक १६.०३.२०१९ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे. योजना देखभालदुरुस्तीकरीता ग्रामपंचायतीकडे दिनांक २३.०४.२०२१ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे.

सरपंच, ग्रामपंचायत मोखावणे-कसारा यांनी दिलेल्या तक्रार अर्जानुसार पाणी पुरवठा विभाग व ग्रामपचांयत सदस्य, मोखावणे - कसारा यांच्या संयुक्त उपस्थितीमध्ये योजनेची पाहणी करुन आवश्यक त्या ठीकाणच्या गळत्या व जल वाहीनीस पाण्याचा कमी दाब मिळत असेल अशा ठीकाणी दुरुस्तीची कामे करुन देण्यात आली असून, योजनेतून सुरुळीत पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील खासगी जलस्त्रोतांच्या गुणवत्ता तपासणीबाबत

**(४२) ६१२६२ (२५-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील खासगी जलस्त्रोतांच्या गुणवत्ता तपासणीसाठी ग्रामीण भागात प्रयोगशाळा नसल्याने ग्रामीण भागातील नागरीकांना जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते तसेच तपासणीचा प्रवास, वेळ व पैशांचा अपव्यय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (३१-०५-२०२३) :** (१) नाही.

कोल्हापूर जिल्हयामध्ये सार्वजनिक पिण्याच्या जलस्त्रोतांच्या गुणवत्ता तपासणी करीता जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या अधिनस्त जिल्हा पाणी तपासणी प्रयोगशाळा अशा २ जिल्हास्तरीय प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या अधिनस्त तालुकास्तरावर ४ उप विभागीय (गडहिंग्जल, कोडोली-पन्हाळा, सोळांकुर-राधानगरी, शिरोळ )पाणी तपासणी प्रयोगशाळा अशा एकूण ६ प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

कोल्हापूर जिल्हयामध्ये सार्वजनिक पिण्याच्या जलस्त्रोतांच्या गुणवत्ता तपासणीसाठी तालुके संलग्न करुन, सर्व ग्रामस्तरावरील पिण्याच्या जलस्त्रोतांच्या गुणवत्ता तपासणी केली जाते.

तसेच, सदर प्रयोगशाळांमध्ये खाजगी जल स्त्रोतांच्या पाणी नमुने तपासणी या विभागाच्या दिनांक १२/०२/२०२१ रोजीच्या शासन निर्णय मधील नमूद शुल्कानुसार केली जाते.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजे मालेवाडी (ता. गंगाखेड, जि.परभणी) येथील बौध्द व राजपूत वस्तीकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याबाबत

**(४३) ६१३७२ (०२-०५-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मालेवाडी (ता. गंगाखेड, जि.परभणी) येथील बौध्द व राजपूर वस्तीकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमणे झाली असल्याने येथील नागरिकांना रहदारीसाठी अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यांवरील अतिक्रमणे काढून हा रस्ता रहदारीसाठी सुरळीत करावा यासाठी सदर नागरिकांनी दिनांक १६/१/२०२३ रोजी वा त्या सुमारास कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तदनुसार उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ५३ (२) नुसार ग्रामपंचायत मालेवाडी (ता. गंगाखेड) यांनी दिनांक २५.०१.२०२३ रोजी रस्त्यावरील अडथळे हटवून रस्ता रहदारीसाठी सुरळीत केला व अतिक्रमणधारकास नोटीस बजावून कायदेशीर कार्यवाही सुरु केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मोखाडा तालुक्यात ( जि. ठाणे ) येथील ठेकेदार व जलजीवन मिशनच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे रस्त्यांची दुरावस्था झाल्याबाबत

**(४४) ६१३७६ (०३-०५-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यात जलजीवन मिशनची जवळपास रुपये २०० कोटीची कामे सुरु असून ठेकेदार आणि जलजीवन मिशनच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे तालुक्यातील रस्त्यांची दुरावस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१०-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

मोखाडा तालुक्यात ५८ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिरणामार्फत प्रगतीपथावर आहे. सदर योजनेच्या रु. २२१.१६ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ३१.०५.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, योजनेचे कार्यादेश दिनांक १३.१०.२०२२ रोजी देण्यात आले आहेत. योजनेच्या विविध ठीकाणी जलकुंभाकरीता जलवाहीन्या टाकणे आवश्यक असल्यामुळे रस्ते खुदाई कामाकरीता जिल्हा परिषद, सार्वजनिक

बांधकाम विभाग, पालघर यांच्याकडे दिनांक ११.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, ठाणे यांच्याकडे दिनांक १९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्याकडे दिनांक ०१.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये परवानगी मागण्यात आलेली आहे. योजनेची कामे विहीत मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने जल वाहिन्या अंथरण्याची कामे सुरु करण्यात आली आहेत. जलवाहिन्यांकरीता खोदण्यात आलेले चर पाईप अंथरल्यानंतर त्वरीत बुजविण्यात येत असून, कामांमुळे बाधीत झालेले रस्ते पुर्ववत करुन देण्यात आलेले आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हयात दरवर्षी पाणीपुरवठयाच्या स्त्रोतांची तपासणी करुन रोगराई नसलेल्या गावांना दर पाच वर्षांनंतर सिल्व्हर कार्ड दिले जात असल्याबाबत

**(४५) ६१६१३ (०३-०५-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात दरवर्षी पाणीपुरवठयाच्या स्त्रोतांची तपासणी केली जात असून सातत्याने पाच वर्षापर्यंत ज्या गावात पाण्यापासून कुठलीही साथ आली नाही, अतिसार अथवा कोणतीही रोगराई आली नाही अशा गावांना दर पाच वर्षानंतर सिल्व्हर कार्ड दिले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हा परिषदेच्या आरोग्य केंद्रामार्फत आरोग्य कर्मचाऱ्यांना त्यांच्या अखत्यारीत गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या जलस्त्रोताचे नमुने घ्यावे लागतात त्या नमुन्यांची तपासणी प्रयोगशाळेत करण्यात येवून पाणी पिण्यायोग्य आहे की नाही याची तपासणी केली जाते त्यानुसार रेड कार्ड, यलो कार्ड व हिरवे कार्ड देण्यात येत असून ज्या गावांचे पाणी स्त्रोत ७५ टक्के दूषित आहे अशा गावांच्या ग्रामपंचायतीला रेड कार्ड देण्यात येते तसेच ३५ टक्के खाली जलस्त्रोत दुषित आहे त्यांना हिरवे कार्ड देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार उक्त जिल्हयातील जि.प.आरोग्य केंद्रामार्फत ६५ गावच्या पाणीस्त्रोतांना येलो कार्ड देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त जिल्हयात दुषित पाण्यामुळे अतिसाराची लागण व संसर्गजन्य आजारांची लागण होत असल्याने जि.प.प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या जलस्तोत्रांचे सर्वेक्षण करण्यात आले असता ३८ गावांना पिण्याचा पाणीपुरवठा दुषित होत असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त जिल्हयात ज्या ग्रामपंचायतींना रेड व यलो कार्ड देण्यात आले आहे त्या विभागात पाणीपुरवठयाचा स्तर सुधारण्याकरिता कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

स्वच्छ सर्वेक्षणातंर्गत गावातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण करण्यात येते. स्वच्छता सर्वेक्षणाच्या निकषांनुसार संबंधित जलस्त्रोतास प्राप्त गुणांच्या अनुषंगाने संबंधित ग्रामपंचायतींना लाल, पिवळे व हिरवे कार्ड देण्यात येते.

(३) होय.
(४) हे, अशंत: खरे आहे.

माहे,डिसेंबर,२०२२ मध्ये एकूण तपासलेले पाणी नमुन्यांपैकी ३८ पाणी नमुने दुषित आढळून आले होते. संबंधित दुषित आढळून आलेल्या जलस्त्रोतांवर क्लोरिनेशनच प्रक्रिया करुन, पाणी नमुने पुर्नतपासणीस पाठविले असता, अहवाल योग्य आला आहे.

गावात दुषित पाण्यामुळे अतिसाराची लागण व संसर्गजन्य आजाराची लागण झालेली नाही.

(५) स्वच्छता सर्वेक्षणांत जळगाव जिल्हयांत सदर कालावधीमध्ये एकही रेड कार्ड प्राप्त झालेले नाही.

पिवळे कार्ड प्राप्त झालेल्या ६६ गावांमध्ये स्वच्छता सर्वेक्षणाच्या उपाययोजना करुन, हिरव्या कार्डात रुपांतरीत करण्यांत आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयात जिल्हा परिषदेच्या जलजीवन मिशनच्या कामांबाबत

**(४६) ६१९८४ (२५-०४-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयात जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडून १ हजार ३४४ गावांमध्ये जलजीवन मिशनअंतर्गत नळ योजनेची तसेच टंचाई निवारणासाठी नळदुरुस्ती योजनेची २७० कामे प्रस्तावीत असून त्यावर १६ कोटी रुपये खर्च करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त टंचाई आराखडयात २७० वर कामे असल्याने जलजीवन मिशनबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे,

(३) असल्यास, जलजीवन मिशनमध्ये घेण्यात आलेले काम टंचाईमध्ये घेण्यात आली असल्याने अशा कामांची तपासणी करुन संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहे,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने जलजीवन मिशनबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०२-०६-२०२३) :** (१) होय,

नागपूर जिल्हयात जलजीवन मिशन अंतर्गत १३४४ कामे जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून प्रस्तावित आहेत. पाणी टंचाई निवारणार्थ २७३ नळ योजनेच्या विशेष दुरुस्तीची कामे प्रस्तावित असून त्यासाठी १६.८४ कोटी खर्च जिल्हा प्रशासनकडून प्रस्तावित करण्यात आला होता. सद्यस्थितीत आवश्यकतेनुसार व गरजेनुसार २७३ पैकी ११८ नळ दुरुस्ती योजना हाती घेण्यात आल्या असून सदर कामांची प्राकलने तयार करण्यात आली आहेत. या दुरुस्ती कामासाठी ६.९९ कोटी इतका दुरुस्ती खर्च जिल्हा परिषद नागपूर यांचेमार्फत प्रस्तावित करण्यात आला आहे.

(२) जल जीवन मिशन अंतर्गत नागपूर जिल्हयात १३४४ उपाययोजना घेण्यात आलेल्या आहेत. हया सर्व कामांना तांत्रिक मान्यता देऊन प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. १३४४ कामाचे मार्च २०२३ अखेर सर्व कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सदरच्या उन्हाळयात विहीरीचे व जलकुभांचे कामे पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदर योजनेपैकी १४४ योजनांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित १२०० योजनांची कामे प्रगतिपथावर आहेत.

(३) व (४) जलजीवन मिशनमध्ये प्रतिदिन प्रतीमाणसी ५५ लिटर प्रमाणे योजना तयार करण्यात आलेल्या असून बहुतांश कामे सुरु झालेली आहेत. सुधारणात्मक पुर्नजोडणी (रेट्रोफिटिंग) ची कामे जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे व नवीन कामे डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

पाणी टंचाई २०२२-२३ अंतर्गत उन्हाळया मध्ये पिण्याच्या पाणी संदर्भात कोणत्याही अडचणी उद्भवू नये याकरिता व सदर ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार व ठरावानुसार सदर उपाययोजना जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## रायगड जिल्हयात पाण्याची साठवणूक नसल्याने त्याचा फटका अनेक गाव व वाडयातील ग्रामस्थांना बसत असल्याबाबत

**(४७) ६२०९८ (०३-०५-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात पाण्याची साठवणूक नसल्याने त्याचा फटका अनेक गाव व वाडयातील ग्रामस्थांना बसत असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी टंचाई जिल्हयातील एकूण ९४६ गाव व वाडयाना सोसावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेने पाणी टंचाई निर्माण झाल्यास त्याचा मुकाबला करण्याकरिता ७ कोटी ६१ लाख ५८ हजार रुपयांचा पाणी टंचाई आराखडा तयार करुन मंजूरीकरिता सादर करुनही अदयाप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. गुलाबराव पाटील (०१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही

रायगड जिल्हयात पाणी टंचाई निर्माण झालेल्या गाव/वाडयांना मागणी नुसार टँकर्सद्वारे ४७ गावे व १५६ वाडयांना पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. या शिवाय नवीन विंधन विहिर घेणे या योजनेअंतर्गत १५ गावे ३९ वाडयांना जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच, जल जीवन मिशन अंतर्गत १४२२ नळ पाणी पुरवठा योजना मंजूर असून ५२ योजना पूर्ण झाल्या आहेत, उर्वरित योजना प्रगतीपथावर असून जिल्हयातील पिण्याचे पाणी टंचाईचे योग्य नियोजन जिल्हास्तरावर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भत नाही.

---

## मारेगांव तालुक्यातील (जि.यवतमाळ) रस्यांचा कामाच्या दुरुस्तीबाबत

**(४८) ६२१८८ (०२-०५-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगांव तालुक्यातील (जि.यवतमाळ) येथील प्रजिमा १४ ते सराटी ते पेंढरी (बुंराडा हटवांजरी) (T.R-१२) या रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत सन २०१९ मध्ये पुर्ण करण्यात आलेल्या रस्त्याचे तीन वर्षाच्या कालावधीमध्ये रस्ता फुटून खडडे पडल्याने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना विभागाकडून पॅचेसचे बुजविण्याचे काम करण्यात येत असून सदर काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करणेसह संबंधीत दोषी अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारीत किमान वेतनाची थकबाकी देण्याबाबत

**(४९) ६२२१० (२५-०४-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारीत किमान वेतन उद्योग उर्जा कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी अधिसुचना निर्गमित करुन रुपये ११,६२५/- ते १४,६२५/- लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांनाही ग्राम विकास विभागाने दिनांक ०१ एप्रिल, २०२२ पासून आदेश निर्गमित केल्याने दिनांक.१० ऑगस्ट, २०२० ते ३१ मार्च, २०२२ पर्यंतचे किमान वेतन थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सुधारीत किमान वेतन, परिमंडळ निहाय उपरोक्त कालावधीतील वेतनाची थकबाकी दिनांक १० ऑगस्ट, २०२० च्या अधिसुचनेनुसार देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनकडून राज्य शासनाकडे वारंवार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णय घेतला आहे वा याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना रु.११,६२५/- ते रु. १४,१२५/- इतका सुधारीत किमान वेतन लागू केले आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासन निर्णय दि.२२.०६.२०२२ अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारीत किमान वेतन लागू करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषदेच्या विविध पदांच्या भरती परीक्षेबाबत

**(५०) ६२२५० (०२-०५-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेच्या भरती परीक्षा एकाच वेळी पार पडण्याकरिता दोन कंपन्यांची नियुक्ती केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियुक्त केलेल्या कंपन्यांमुळे परीक्षा भरती प्रक्रिया लांबणीवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार उक्त पदभरती वेळेत पार पाडण्याबात तसेच अधिक प्रमाणात पद भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. सन २०२३ मध्ये जिल्हा परिषदेंतर्गत होणाऱ्या गट-क संवर्गातील भरती परीक्षा पार पाडण्याकरीता आय.बी.पी.एस. या कंपनीची निवड करण्यात आली आहे.

(२) नाही.

(३) ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील जिल्हा परिषदेंतर्गत गट-क मधील आरोग्य व इतर संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम विभागाच्या दि.२१.१०.२०२२ व दि.१५.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आला होता. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परिक्षा टि.सी.एस./ आय.बी.पी.एस. या कंपन्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्यात आला असून त्यानुषंगाने Application Portal विकसित करुन लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.